॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++' grade

**Academic Planning & Development Section**

**Phone: (02462) 215542** **Website: www.srtmun.ac.in** **E-mail: apds@srtmu.ac.in**

**अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांची संशोधन मार्गदर्शकांच्या महाविद्यालयात बायोमेट्रीक उपस्थिती (Biometric Attendance) संशोधक मार्गदर्शकांनी प्रमाणित करणे बाबत.**

पहा : ०१. विद्यापीठ परिपत्रक क्रमांक शैनिविवि/अधिछात्रवृत्ती/नियमावली/२०२३–२४/११९४, दिनांक २४.०५.२०२३
०२. विद्यापीठ परिपत्रक क्रमांक शैनिविवि/अधिछात्रवृत्ती/सुधारीत नियमावली/२०२४–२५/३००, दिनांक १२.११.२०२४
०३. वद्यापीठ परिपत्रक क्रमांक शैनिविवि/हमीपत्र/अधिछात्रवृत्ती/२०२४–२५/३६८, दिनांक २३.११.२०२४

# परिपत्रक

या परिपत्रकान्वये आदेशानुसार मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर, उपपरिसर, मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये/संशोधन केंद्र, संशोधन मार्गदर्शक यांना कळविण्यात येते की, प्रशासनाच्या असे निदर्शनास आले की, काही संशोधक विद्यार्थी संशोधन केंद्रात बायोमेट्रीक उपस्थिती न नोंदवता अधिछात्रवृत्तीच्या प्रस्तावासोबत हस्तलिखीत (Manual Attendance) उपस्थिती संशोधक मार्गदर्शक यांनी प्रमाणित केलेली सादर करीत आहेत. सादर केलेल्या उपस्थिती कालावधीत अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थी इतरत्र सेवेत असण्याची अथवा मानधन तत्वावर कार्यरत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सारथी, बार्टी, महाज्योती व इतर वित्तीय संस्थांनी पुर्वलक्षी प्रभावाने पीएच.डी. नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती मंजूर केल्याचे दिसून येते. त्यानुसार पीएच.डी. प्रवेश दिनांकापासून अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थी **आपल्या संशोधन केंद्रात** पुर्णवेळ उपस्थित असले बाबत आपल्या महाविद्यालयात संशोधक विद्यार्थ्यांची बायोमेट्रीक उपस्थिती (Biometric Attendance) **नोंदवून** संशोधक मार्गदर्शक यांनी प्रमाणित करणे अनिवार्य आहे. तसेच प्रत्येक महिण्याच्या पाच तारखेपूर्वी बायोमेट्रीक उपस्थिती अहवालाची एक प्रत **apds.srtmun@gmail.com** या ई–मेलवर पाठवावी. जेणे करून अधिछात्रवृत्तीचा प्रस्तावावर योग्य ती कार्यवाही करता येईल. सदरील कार्यवाही तातडीने सुरू करणे अनिवार्य आहे.

सदर नियमावली हे परिपत्रक प्रकाशित झालेल्या दिनांकापासून लागू राहील याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

जा.क्र. शैनिविवि/बायोमेट्रीक/अधिछात्रवृत्ती/२०२४–२५/438
दिनांक : १६.१२.२०२४

कुलसचिव

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

०१. मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
०२. मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
०३. मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
०४. मा.प्राचार्य/संशोधन केंद्र प्रमुख, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
०५. मा.संशोधन मार्गदर्शक, प्रस्तुत विद्यापीठ
०६. मा.कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
०७. मा.वित्त व लेखाधिकारी, लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
०८. मा.उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
०९. सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर APDS या Link वर प्रकाशित